# मगरपट्टा ते VSTF मार्गे गडचिरोली: माझा अनुभव

मी उमेश जाधव. नांदेड जिल्ह्यातील हिमायतनगर तालुक्यात माझं गाव. २०१४ साली IT इंजिनीरिंग झाल्यानंतर मी एका सॉफ्टवेअर कंपनीत १८ महिने काम केलं. पहिल्या पगारासोबत आलेलं आर्थिक स्वातंत्र्य, पुण्यातलं - कोर्पोरेटमधलं आरामदायक आयुष्य असं वर्षभर एकदम सुखात गेलं. नंतर नंतर ते करतांना माझ्या कामाचा relevance कळत नव्हता. एका मोठया अमेरिकन कंपनीला विभागवार नफा तोटा समजून घ्यायला मी दुपारी २ ते रात्री १२पर्यंत काम करायच करायचो. वीकेंडला नवीन नवीन ट्रेक्स करूनही सोमवारी कामात उत्साह वाटायचा नाही. फक्त पैसे मिळताहेत म्हणून तेच करत राहावं हे पटलं नाही. एकदाच भेटणारं आयुष्य मला हे असं घालवायचं नव्हतं. पोटाला भाकर, डोक्याला आव्हान आणि मनाला समाधान देणारं काय काम करायचं काय ह्याचं उत्तर शोधत होतो.

निर्माण प्रक्रियेत शेती, शिक्षण, रोजगार, आरोग्य ह्या क्षेत्रातील अडचणी, सामाजिक प्रश्न ह्यांची एकमेकांतली गुंतागुंत समजून घेतली होती. माझं IT चं शिक्षण आणि थोडाफार अनुभव वापरून मी कुठल्या सामाजिक प्रश्नावर काम करू शकतो का? प्रश्न सोडवण्याच्या वेगवेगळ्या मार्गापैकी मी कुठला मार्ग निवडू म्हणजे Domain & Specific Role च्या शोधात होतो. एखाद्या प्रश्नाबद्दल अगदी खोलात जाऊन समजून घेतलं तर तो सोडवण्यात फार मदत होते. काम करतांना Data आणि Research ह्यांचा साधन म्हणून वापर केल्यास ते अधिक परिणामकारक होते हे पाहिलं होतं. तेंव्हा सामाजिक प्रश्नांवर Research कसा करतात त्याची माहिती अन कौशल्य (Statistical Software Packages) शिकून घेतले. ग्रामीण भागात दर्जेदार संशोधन करण्याचा अनुभव असलेली SEARCH ही संस्था एक नवीन Resource शोधत होती. निर्माणमुळे शोधग्रामचे Work Ethics आणि एकूणच वातावरण आवडले होतेच. म्हणून सर्च सोबत काम करण्याचा निर्णय घेतला.

गडचिरोली जिल्ह्यातील 150 गावांमध्ये आरोग्य - व्यसनमुक्ती ह्या विषयांवरती विविध संशोधन प्रकल्पात Data Cycle



Management ची सगळी कामं शिकायला आणि करायला मिळाली. Research Methodology आणि Statistics हे पुस्तकातून शिकण्यापेक्षा प्रत्यक्ष कामातून शिकताना मजा येते, ते अनुभवलं. कामासाठी सगळा गडचिरोली जिल्हा फिरलो, तिथलं जगणं, संस्कृती, तिथले लोकल प्रश्न प्रत्यक्षात पाहत होतो. समाजातील प्रत्येक गटाच्या स्वतःच्या Health Priorities असतात. 50 वर्षापेक्षा मोठ्या लोकांसोबत बीपी शुगरच्या बीमारीवर, शाळकरी मुलांसोबत व्यसनमुक्ती प्रकल्पात, आरोग्यदूतांसोबत महिला आणि शिशु काळजीमध्ये त्यांच्या अडचणी पहिल्या. सर्चच्या कामातून त्या कशा परिणामकारक पद्धतीने सोडवायचे ह्याचा प्रयत्न केला. तंबाखू वर किती खर्च होतो ते मोजताना, त्या प्रश्नांची Complexity समजत होती. हे करतांना टिमवर्क शिकलो. 4थी पास आरोग्यदूत आणि MD medicine डॉक्टर दोघांसोबत काम केलं. सर्चमध्ये 25 महिन्यात मी ग्रामीण भागात रिसर्च कसा करायचा हे तर शिकलोच पण तो का करायचा अन कामात ते कसा वापरायचा हे शिकलो. कुठल्याही सामाजिक प्रश्नावर काम करताना Local Community Involvement and their Empowerment शिवाय दूरगामी आणि Sustainable Impact होत नाही हे शिकलो.

घरच्या जबाबदाऱ्यासाठी मी जानेवारी २०१९ मध्ये सर्च सोडलं. नांदेड जिल्ह्यातील हिमायतनगर तालुक्यात माझ्या गावात ८ महिने राहिलो . फक्त गावात राहून ग्रामीण मराठवाड्यातील विविध प्रश्नांची गुंतागुंत पाहत होतो. गावागावात रिकामे पारावार बसून व्हाट्सअप आणि टिकटॉक - टिकटॉक करणारे २० -२५ पोरांचे टोळके दिसत होते. पंजा /बाण /कमळाच्या राजकारणावर गप्पा करणारे एक-से-एक बहाद्दर भेटत होते. अंधारमय भविष्य दाखवणारे पाण्याचे दुर्भिक्ष प्रत्यक्ष जगत होतो. लोकांशी बोलताना एक गोष्ट जाणवली कि आपण भयानक अवस्थेत जगत आहोत, गंभीर प्रश्न आहेत हे सगळे सांगत होते. पण त्या सोडविण्यासाठी आपण काही करू शकतो, ते कुठेच येत नव्हतं. सरकारने आम्हाला नोकऱ्या द्याव्या, पाणी द्यावे, योजना द्याव्या असं मत होतं. बरं, सरकार म्हणजे म्हणजे काय? कोण? त्यात आपली भागीदारी काय? त्याचं कोणाला काहीच नव्हतं. ५ वर्षात येणाऱ्या प्रत्येक निवडणुकीत बोटाला शाई लावून, ग्राम पंचायत सदस्य - पंचायत समिती -जिल्हापरिषद सदस्य - आमदार- खासदार निवडून दिले की आपली जबाबदारी संपते, अजून काय असते? लोकशाही म्हणजे फक्त निवडणूक. आल्या घराजवळ होणार सिमेंट रस्त्यात गज-सिमेंट आहे का? शेताजवळील बंधारा मजबूत बांधतात का? त्याच कोणालाही घेणंदेणं नव्हतं. एखाद्या गावाच्या/भागाच्या समस्या सोडविण्यात आणि विकासात तिथल्या लोकांचा सहभाग कसा वाढवता येईल? ग्रामपंचायतीच्या प्रत्येक निर्णयात लोकांचा मत असणारी खरी लोकशाही आणण्यात मी काय करू शकतो हे शोधायला सुरु केलं. ७३ व्या घटना दुरुस्तीत मिळालेल्या ग्रामसभेच्या हक्कांबद्दल, त्रिस्तरीय पंचायत राज व्यवस्थेबद्दल वाचलं.



तेंव्हाच महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विकास विभागातर्फे सुरु झालेल्या ग्रामीण सामाजिक परिवर्तन अभियानात असलेल्या एका संधीबद्दल कळालं. माझ्या Data Analysis Skills आणि गडचिरोलीच्या अनुभवाच्या जोरावर निवडही झाली, ऑगस्ट २०१८ मध्ये Data Driven Governance Consultant म्हणून रुजू झालो.

Maharashtra Village Social Transformation Foundation

An Initiative of the People of Maharashtra

राज्यातील १००० गावांचा लोकसहभागातून आदर्श गाव म्हणून शाश्वत विकास करणे असा कार्यक्रमाचे ध्येय आहे. त्यात Monitoring-Evaluation & Data Analyst हे माझं काम आहे. प्रत्येक ग्रामपंचायत दरवर्षी आपला विकास आराखडा बनविते. गावाचा विकास करायचा म्हणजे काय करायचे? मिळणाऱ्या निधीतून कुठली विकासकामे घ्यायची? शाळेचे छत दुरुस्त करायचे आधी की पांदण रस्ते/ नाली बांधकाम आधी ते ग्रामसभेत चर्चा करून सर्वानुमते ठरविणे अपेक्षित असते. सगळे आराखडे कागदावर बनतात . त्यातही फारच तोकडं आणि गरजेचंच नियोजन असते. संपूर्ण गावाची नेमकी गरज घेऊन हा 'Village Development Plan' Comprehensive बनविता येईल आणि हा आराखडा Digitally बनवला तर त्यातील विकासकांची प्रगती track करण्यासाठी सोप्पं होईल, असा ठरवून आम्ही GPDP MIS मॉनिटरिंग सिस्टीम बनवली.

आज कार्यक्रमाच्या १००० गावांमध्ये ह्या MIS वर विकासकांमाचे नियोजन आणि Monitoring होत आहे. कामांची प्रगती काय आणि कुठली कामे प्रलंबित आहेत ती यादी वेळोवेळी वरिष्ठ अधिकाऱ्यांना जाते. Follow-up मुळे वर्षानुवर्षे प्रलंबित असलेली कामे लवकर होतात. विकासकामांच्या नियोजनात ग्रामसभेचा सहभाग, विकासकामांच्या खर्चात पारदर्शकता आली हे मी पाहतोय. माझ्या कामात मला ग्रामपंचायत ते मंत्रालयापर्यंत असलेली सरकारी यंत्रणा पाहायला मिळाली.

मोबाईलमुळे माहिती तंत्रज्ञान/इंटरनेट सगळीकडे पोचलंय परंतु ग्रामविकासाच्या कामांत माहिती विश्लेषनाचा वापर आजून व्हावा तितका झाला नाही. एखाद्या भागातील प्रश्न समजून घेण्यात (Situational Analysis - Surveys), तो सोडवण्यासाठी कार्यक्रम रचण्यात आणि तो अपेक्षित प्रकारे चाललाय कि नाही ते पाहण्यात (Project Monitoring) माहिती फार उपायकारक आहे. कार्यक्रमाच्या कामात कुठे कसर राहत आहे ते पाहून, नेमकं तिथे Corrective Measures घेण्यात, Follow-up करण्यासाठी MIS चा वापर होतो. आपल्या कामाचा परिणाम १००० गावांतील १६ लाख लोकांच्या आयुष्यावर थेट काहीना-काही चांगला परिमाण होतो आहे, ते दिसणं फार समाधानकारक आहे. जवळ असलेल्या ज्ञानाचा आणि कौशल्यांचा वापर करून मी १००० गावांच्या विकास आराखाड्यात परिणामाकता आणि पारदर्शिकता आणण्याचा प्रयत्न करतो आहे. लोकांचा ग्रामविकासाच्या कामांत -निर्णयप्रक्रियेत सहभाग वाढविण्याचा प्रयत्न करतो आहे.

प्रत्येक जण समाजाला काहीतरी देऊ शकतो, तेवढ ज्ञान आणि कौशल्य  आपल्याकडे असतेच. फक्त त्याची गरज कुठेय आणि मी कसं Contribute करू ते समजून घेतलं पाहिजे.



उमेश जाधव

महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन अभियान

jadhavumesh007@gmail.com